शैक्षणिक संदर्भ अंक १४८ (जून - जुलै २०२४)

महा इतिहास - भाग २८

# विसावे शतक - २

लेखक : प्रियदर्शिनी कर्वे

# विसावे शतक - २

लेखक : प्रियदर्शिनी कर्वे

*दुसऱ्या महायुध्दानंतर युरोपीय साम्राज्यांची शकले होऊन जगाच्या राजकारणात वेगळे गटतट कसे निर्माण झाले हे आपण मागच्या लेखात पाहिले. या व पुढील लेखात विसाव्या शतकात जगाचे आजचे स्वरूप कसे आकाराला आले याकडे पाहूया.*

आज जगाचा जो राजकीय नकाशा दिसतो, तो दुसऱ्या महायुध्दानंतर तयार झालेला आहे. काही देशांची निर्मिती तर या शतकातही झाली आहे. थोडक्यात म्हणजे आज जगाची जी संरचना आपण अगदी गृहीत धरतो तिला शंभर वर्षेही पूर्ण झालेली नाहीत आणि भविष्यात आणखीही बदल होतच राहतील. चित्र १ व २ मध्ये दुसऱ्या महायुध्दाच्या आधीची व युध्दानंतर काही दशकांनंतरची जागतिक परिस्थिती दाखवली आहे. त्यावरून महायुध्दाचा परिणाम काय झाला ते सहज दिसून येईल.

जागतिक मानवी समाजव्यवस्थेत झालेले बदल केवळ राजकीय नव्हते. आधुनिक जगात विरोधकांवर मात करण्यासाठी आर्थिक प्रगती हे एक महत्त्वाचे हत्यार असणार आहे, हे सत्य अमेरिका व रशिया या दोन भिन्न विचारसरणीच्या राष्ट्रांनी जाणलेले होते. दुसऱ्या महायुध्दात हे दोन्ही देश एकाच बाजूने लढले होते. पण युध्दातून बाहेर पडताना अमेरिकेची आर्थिक, राजकीय व सामरिक ताकद वाढलेली होती. रशियाची ताकद खूपच कमी झालेली असली आणि खूप मोठ्या संख्येने मनुष्यहानी झालेली असली तरी आता जवळजवळ सर्व पूर्व युरोप रशियाच्या राजकीय अंमलाखाली आलेला होता.



*चित्र १ - दुसऱ्या महायुध्दापूर्वीच्या जगाचा राजकीय नकाशा (जगाच्या वेगवेगळ्या भागांतील राज्यकर्त्यांच्या झेंड्यांद्वारे) (स्रोत - विकीपिडीया)*



*चित्र २ - विसाव्या शतकाच्या अखेरीस जगाचा राजकीय नकाशा (जगाच्या वेगवेगळ्या भागांतील राज्यकर्त्यांच्या झेंड्यांद्वारे) (स्रोत - विकीपिडीया)*

१९४४ मध्ये जागतिक भांडवलदारी अर्थव्यवस्थेचा पाया मजबूत करण्याच्या दृष्टीने अमेरिकेच्या पुढाकाराने जागतिक बँक आणि आंतरराष्ट्रीय नाणेनिधी स्थापन केले गेले. १९४५ साली संयुक्त राष्ट्रसंघाची स्थापना झाली. एका दृष्टीने जगभर पसरलेल्या सर्व मानवी समाजाचा एकत्रित विचार करण्याची ही सुरूवात होती असेही म्हणता येईल.

अमेरिकी आर्थिक सहकार्यामुळे १९५०चे दशक संपेपर्यंत पश्चिम युरोपातील देशांच्या अर्थव्यवस्था पुन्हा एकदा भरभराटीस आल्या होत्या. दैनंदिन वापराच्या आधुनिक साधनांची - फ्रीज, वॉशिंग मशीन, गाड्या इ. - मागणी आणि पुरवठाही वाढू लागला होता. आशियामध्ये दुसऱ्या महायुध्दात वाताहत झालेला जपानही भांडवलशाही विचारसरणीच्या लोकशाही शासनांच्या अधिपत्याखाली व अमेरिकेच्या आर्थिक मदतीच्या जोरावर जागतिक पातळीवरील एक आघाडीचा कारखानदार देश बनला. जपानच्या पावलावर पाऊल ठेवून दक्षिण कोरिया, तैवान, सिंगापूर या तथाकथित आशियाई वाघांच्या अर्थव्यवस्थाही झपाट्याने वाढू लागल्या. इराणच्या आखातात पेट्रोलियमचे साठे सापडल्यानंतर काही हजार वर्षे विविध साम्राज्यांचे दमन सहन केलेल्या मध्यपूर्वेतही अचानक आर्थिक सुबत्ता आली. दुसऱ्या महायुध्दानंतरच्या या एक-दोन दशकांत आफ्रिका आणि दक्षिण अमेरिकेतल्या गरीबातील गरीब देशांतही थोडीफार का होईना पण आर्थिक प्रगती नागरिकांना अनुभवता आली.


वरवर जरी अमेरिका व रशिया हे दोन्ही देश साम्राज्यवादाचा विरोध करत असले, तरी हे दोन्ही देश स्वतःच साम्राज्यवादातून उभे राहिलेले होते. युरोपीय साम्राज्यवादाविरुध्द लढून अमेरिकेतल्या युरोपीय वंशाच्या लोकांनी स्वातंत्र्य मिळवले होते हे खरे आहे. पण मुळात स्थानिक मूलनिवासी लोकांचे आणि आफ्रिकेतून जबरदस्तीने आणून वसवलेल्या काळ्या लोकांचे दमन करूनच अमेरिकेत युरोपीय लोकांनी पाय रोवले होते, हे विसरून चालणार नाही. दुसऱ्या महायुध्दानंतरही आपल्या आर्थिक व लष्करी मदतीच्या जोरावर फिलिपाइन्ससारख्या इतर काही देशांना आपले मिंधे करून ठेवून अमेरिकेने एका वेगळ्या

रूपात साम्राज्य चालवलेच होते. त्याउलट रशियन संघराज्य (सोविएत यूनियन) हा पूर्वीच्या रशियन झारच्या अधिपत्याखालील रशियन साम्राज्याच्या वसाहतींचाच संघ होता आणि यात स्थानिकांपेक्षा रशियनांचेच वर्चस्व होते. या वसाहतींना स्वातंत्र्य मिळण्यासाठी १९९०चे दशक उजाडावे लागले. दुसऱ्या महायुध्दानंतर संपूर्ण पूर्व युरोपात आपल्या ताटाखालची मांजरे असलेली सरकारे उभी करून रशियानेही आपला साम्राज्यवाद चालूच ठेवला. युरोपातील मूळच्या औद्योगिक शक्तींची साम्राज्ये मात्र दुसऱ्या महायुध्दानंतर मोडीत निघाली. पण वसाहतींतून बाहेर पडताना युरोपियनांनी तिथे भौगोलिक स्थिती व सांस्कृतिक इतिहासाची पर्वा न करता वाटेल तशा सीमारेषा नकाशांवर आखून भावी संघर्षांची बीजेही पेरली. ह्या इतिहासाची चर्चा आपण मागे केली आहेच.

भारतीय उपखंडातील स्वातंत्र्य लढ्यात अहिंसात्मक दृष्टिकोन व वेळोवेळी स्वातंत्र्याचे मिळतील ते आयाम पदरात पाडून घेऊन लढत रहाण्याच्या धोरणाचा एक परिणाम असा झाला होता, की मर्यादित स्वरुपात प्रांतिक शासनांमध्ये स्थानिकांना भागीदारी मिळालेली होती व वेगवेगळ्या विचारांच्या लोकांना बरोबर घेऊन लोकशाही पध्दतीने राज्य चालवण्याचा अनुभव गाठीला असलेली राजकीय नेत्यांची फळी स्वातंत्र्याचे व्यवस्थापन करण्यासाठी तयार झाली होती. दुर्दैवाने नव्याने स्वतंत्र झालेल्या इतर देशांमध्ये केवळ संघर्ष व लढायांचाच अनुभव असलेले नेतृत्व आता देशाचा गाडा हाकू पहात होते. त्यामुळे यांपैकी बऱ्याच देशांत जनतेला स्वातंत्र्य असे मिळालेच नाही - परकीय दमनकर्त्यांची जागा आता स्वकीय दमनकर्त्यांनी घेतली इतकेच. भारतीय उपखंडातही जे दोन देश ब्रिटिशांनी मागे सोडले त्यातील एकाने विविधतेतून एकतेच्या सूत्रावर व लोकशाही राज्यपध्दतीवर भर दिला

तर एकाने धार्मिक ओळख व लष्करी ताकद महत्त्वाची मानली. त्या दोन्ही देशांच्या आजच्या राजकीय व आर्थिक परिस्थितींतील फरक आपण पहातो आणि अनुभवतो आहोतच!

एकीकडे भांडवलशाहीच्या जोरावर पसरलेल्या साम्राज्यांची पीछेहाट होत असतानाच सोव्हिएत रशियाने मात्र युध्दानंतरची हानी भरून काढण्यावर लक्ष केंद्रित केले. १९५०च्या मध्यापर्यंत रशिया पुन्हा एकदा एक बलशाली राष्ट्र म्हणून ओळखला जाऊ लागला होता. याचदरम्यान युरोपीय भांडवलशाहीच्या कचाट्यातून स्वतंत्र झालेल्या अनेक देशांना साम्यवादी विचारसरणीवर चालणाऱ्या रशियन संघराज्याच्या राज्यपध्दतीचे आकर्षण वाटणे स्वाभाविकच होते. रशियन संघराज्यानेही या नवस्वतंत्र देशांना आर्थिक, तांत्रिक, आणि कधीकधी सामरिक सहकार्य करून आपले प्रभावक्षेत्र वाढवले. या काळात रशियातील वैज्ञानिक प्रगतीनेही जगभरातील लोकांना थक्क केले. १९५७ साली पहिला कृत्रिम उपग्रह, १९६१ मध्ये अवकाशात पहिला मानव, इ. पहिलेपणातून वैज्ञानिक क्षेत्रात रशियाने दबदबा निर्माण केला. या काळात निकिता ख्रुश्चेव्ह यांच्या नेतृत्वाखाली रशियातील राजकीय व आर्थिक परिस्थितीतही बऱ्याच सुधारणा होऊन लोकांचे जीवन बऱ्यापैकी सुखदायी होऊ लागले. रशियाप्रमाणेच साम्यवादी विचारसरणीचे सरकार असलेल्या चीनचीही या काळात चांगली भरभराट झाली व रशियाच्या प्रभावाखालील पूर्व युरोपातही अर्थव्यवस्थांना बऱ्यापैकी चालना मिळाली.



*चित्र ३ - जगातील पहिला कृत्रिम उपग्रह - स्पुटनिक (स्रोत - विकीपिडिया)*

नव्याने स्वतंत्र झालेल्या काही देशांतील राज्यकर्त्यांनी अमेरिकेचे तर काहींनी रशियाचे वर्चस्व मान्य करून आपापली खुर्ची सुरक्षित ठेवण्यासाठी आपल्या देशाच्या प्रगतीचा मार्ग खुंटवला. या दोन महाशक्तींमधील राजकीय व आर्थिक संघर्षालाच शीतयुध्द म्हटले जाते. नव्याने स्वतंत्र झालेल्या भारताच्या नेतृत्वाने मात्र या दोन्ही प्रतिस्पर्धी प्रवाहांपासून अलिप्त राहून दोघांशीही मित्रत्वाचे नाते ठेवण्याचा प्रयत्न केला. ही तारेवरची कसरत राजकीय दृष्ट्या कधी फसली तर कधी यशस्वी ठरली, पण यातून अमेरिका व रशिया यांमधील शीतयुध्दाला अलिप्त राष्ट्रांचा एक पर्याय उभा राहिला. दोन्ही बाजूंकडून मिळेल ती मदत पदरात पाडून घेत देशांतर्गत रचनात्मक कामावर भर देऊन मूलभूत गरजांची पूर्तता करण्याबाबत स्वावलंबी कसे बनता येईल, यावर या काळात भारतातल्या धोरणकर्त्यांनी भर दिला. त्याच पायाभरणीमुळे शीतयुध्द संपल्यावर जागतिक अर्थव्यवस्थेचा भाग बनल्यावरही आपले स्वतंत्र अस्तित्व टिकवून ठेवणे भारतातील उद्योगक्षेत्राला शक्य झाले आहे.



*१९६१ साली बेलग्रेड येथील परिषदेत अलिप्त राष्ट्रांच्या गटाची अधिकृत स्थापना झाली त्यावेळी इजिप्तचे अध्यक्ष नासेर, युगोस्लाव्हियाचे अध्यक्ष मार्शल टिटो व भारताचे पंतप्रधान जवाहरलाल नेहरू. (स्रोत - विकीपिडिया)*

१९५०च्या दशकात देशातील उद्योगधंदे आणि नागरिकांचे जगणेही पूर्णतः शासकीय नियंत्रणाखाली ठेवणाऱ्या साम्यवादी व्यवस्थेने नागरिकांच्या आणि उद्योगांच्या व्यक्तिगत स्वातंत्र्यावर भर देणाऱ्या भांडवलशाही व्यवस्थेपेक्षा चमकदार कामगिरी केली असली तरीही

१९७०च्या सुमारास रशियन अर्थव्यवस्थेत मंदीचे वातावरण पसरू लागले. यामागचे एक महत्त्वाचे कारण म्हणजे सर्व गोष्टींवर शासकीय नियंत्रण व नियमपालनाचा अट्टाहास यामुळे सामूहिक ज्ञाननिर्मिती व आविष्कारांना आळा बसला. नवे आविष्कार घडण्यासाठी जे मुक्त वातावरण असायला हवे तसे साम्यवादी व्यवस्थेत अजिबात नव्हते. त्याउलट सामूहिक ज्ञाननिर्मिती व आविष्कारांसाठी पोषक वातावरण असल्याने युरोप व अमेरिकेतील अर्थव्यवस्था व उद्योगधंदे राजकीय उलथापालथी होत असतानाही पुढे पुढे जात राहिले. या साऱ्यामुळे १९९० च्या दशकात रशियन महासंघाचे अस्तित्व टिकणे अवघड झाले व त्याची अनेक स्वतंत्र देशांच्या स्वरूपात शकले उडाली. दुसऱ्या बाजूला चीनमधील राज्यकर्त्यांनी वेळीच हा धोका ओळखला आणि आपल्या अर्थव्यवस्थेत नवचैतन्य भरू शकतील अशा घटकांना भांडवलशाही पध्दतीचे स्वातंत्र्य देण्याचे धोरण साधारण १९७८ पासून अवलंबले. एक आघाडीचे औद्योगिक राष्ट्र म्हणून आज चीनची झालेली प्रगती ही साम्यवादी राज्यव्यवस्थेत भांडवलशाही उद्योजकतेची यशस्वी सरमिसळ करण्यातून झाली आहे. अर्थात यात चीनमधील नागरिकांच्या व्यक्तिस्वातंत्र्याचा संकोच होतोच आहे. त्यामुळे देशाची व देशातील उद्योगांची आर्थिक स्थिती चांगली असली, तरी सर्वसामान्य नागरिकांचे जीवन काही फार चांगले आहे असे नाही.

एकंदरीतच राजकीय नियंत्रण व उद्योगधंद्यांना मोकळीक याचा सुवर्णमध्य साधण्यासाठी जगभरात झालेले प्रयत्न असे १९५० नंतरच्या विसाव्या शतकाचे वर्णन करता येईल. भारतातही याचे प्रतिबिंब उमटले होते. स्वातंत्र्यानंतर सुरूवातीच्या काळात उद्योगधंद्यांवर सरकारचे बऱ्यापैकी नियंत्रण होते. पण त्याचबरोबर तुलनेने अधिक प्रगत

परकीय उद्योगधंद्यांना शासकीय हस्तक्षेपाद्वारे देशाबाहेर थोपवून धरले गेल्याने स्थानिक उद्योगांना संरक्षणही मिळाले. परिणामी १९९०च्या दशकात भारतील अर्थव्यवस्था खुली होईपर्यंत इथल्या उद्योगधंद्यांचा पाया भक्कम झालेला होता. ज्या देशांनी स्वातंत्र्य मिळाल्याबरोबर आपली बाजारपेठ खुली केली होती तिथे स्थानिक उद्योगांना संधीच मिळाली नाही. याउलट भारतीय अर्थव्यवस्था खुली झाल्यावर भारतातील काही स्थानिक उद्योग जागतिक स्पर्धेत उतरून बहुराष्ट्रीय उद्योग बनू शकले.

विसाव्या शतकातील आणखी एका जागतिक घडामोडीने एकविसाव्या शतकाच्या जडणघडणीत महत्त्वाचे योगदान दिले आहे. साधारण १९६० नंतर जागतिक पातळीवर जननदर सातत्याने कमी होत गेला. जागतिक लोकसंख्या तरीही वाढत राहिली कारण लोकांचे आयुर्मान वाढत गेले. याचबरोबर जागतिक पातळीवर अर्थव्यवस्थांच्या भरभराटीतून पेट्रोलियम इंधने, लोखंड आणि इतर काही खनिजांचा वापरही झपाट्याने वाढत गेला. या साऱ्याची चर्चा करूया पुढील लेखामध्ये.

*या लेखमालेसाठी संदर्भ म्हणून डेव्हिड ख्रिश्चन व सहकाऱ्यांनी लिहिलेल्या 'बिग हिस्टरी - बिट्विन नथिंग अँड एव्हरिथिंग' या पुस्तकाचा आधार घेण्यात आला आहे.*

§§§

---

**लेखक : प्रियदर्शिनी कर्वे,** संचालक, समुचित एन्व्हायरो टेक, शैक्षणिक संदर्भ संपादक गटात सहभागी.

**इ-मेल :** pkarve@samuchit.com

***(कळीचे शब्द: भांडवलशाही, साम्यवाद, शीतयुध्द, अलिप्त राष्ट्र चळवळ, अमेरिका, रशिया, जपान, चीन, भारत)***

# शैक्षणिक संदर्भ द्वैमासिकाविषयी

शैक्षणिक संदर्भ हे पालकनीती परिवाराचे द्वैमासिक ऑगस्ट १९९९ पासून संदर्भ सोसायटी प्रकाशित करत आहे. २०१८ सालापासून ‘शैक्षणिक संदर्भ’ हा इ-अंक इ-मेल आणि व्हॉट्सॅपच्या माध्यमातून आपल्यापर्यंत आम्ही नियमित पोहोचवत आहोत.

आपल्याला आमचे अंक वाचायचे असल्यास आपला इ-मेल पत्ता आणि व्हॉट्सॅप क्रमांक (ऐच्छिक) आम्हाला sandarbh.marathi@gmail.com वर पाठवावा. दर आठवड्याला एक लेख व दर दोन महिने पूर्ण झाल्यावर आठ लेखांचा एकत्रित एक अंक असे आपल्याला पीडीएफ स्वरूपात मिळतील. आपला व्हॉट्सॅप क्रमांक कळवल्यास आपल्याला Sandarbh Readers या आमच्यावाचक गटामध्ये सामील केले जाईल. तेथेही आपण लेख व अंक वाचू शकाल.

www.sandarbhsociety.org या वेबसाईटला जरूर भेट द्या. जुने अंक त्यावर पीडीएफ स्वरूपात उपलब्ध आहेत. वाचू शकता, डाऊनलोड करू शकता.

या उपक्रमासाठी आपली ऐच्छिक देणगी संदर्भ सोसायटीकडे खालील अकाऊंटमध्ये जमा करू शकता, केल्यानंतर वरील इ-पत्त्यावर तशी मेल करा. अधिक माहिती वेबसाइटवर उपलब्ध आहे.

इ-पेमेंट : Sandarbh Society
Account No.: 20047006634
Bank of Maharashtra, Mayur Colony, Pune
IFS Code: MAHB0000852

***- संपादक मंडळ,शैक्षणिक संदर्भ व विश्वस्त मंडळ, संदर्भ सोसायटी***